# शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ

(जूने शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ)
धामणगांव रोड, यवतमाळ, ४४५००१
डीटीई कोड–१०११
Website : www.gpyavatmal.ac.in, ई–मेल : office.grwpyavatmal@dtemaharashtra.gov.in


---

वर्तमान पत्र , संस्थेच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालय अमरावती संकेत स्थळावर

शातंय /.भां.कें /निविदा / सुरक्षा-२०२३-२४/
दि / /२०२३

निविदा पत्रक क्र.
मूल्य : रू. 5000/-

## निविदा पत्रक

सुरक्षारक्षक मनुष्यबळ सेवा कंत्राटी पद्धतीने निविदा भरण्यासंबंधी अटी व शर्ती दोन पाकीटे ऑनलाईन पद्धतीने प्रमाणे या कार्यालयास नांवे प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ या संस्थेकरिता (मुख्य इमारत, कर्मशाळा इमारत, परिसरातील इतर सर्व इमारती , मुलांचे व मुलींचे वसतिगृह व बगीचा, परिसरातील सर्व इमारती करीता ( एकूण तीन पॉईंट करिता 06 सुरक्षा रक्षक आवश्यक आहे.) मनुष्यबळ करीता रोजंदारी तत्वावर करार पद्धतीने नोंदणीकृत संस्थेकडून/यंत्रणेकडून निविदा मागविण्यात येत आहे.

### कराराच्या अटी व शर्ती

1. कराराचा कालावधी : 11 महिने
2. प्रायोगिक तत्वावर एक महिन्याचा काम करण्याचा कालावधी देऊन पुढील काम देण्यात येईल.
3. कामाची वेळ :- 3 शिफ्ट -24 तास
4. कामाची व्याप्ती व स्वरूप : सुरक्षारक्षक करीता दैनंदिन कामे.

1- नेमून दिलेल्या ठिकाणी सुरक्षा विषय कामे करणे

2- अभ्यागतांची जाणा-या येणा-यांची नोंद घेणे.

3- परिसरात येणाऱ्या अनधिकृत व्यक्तींना प्रवेश नाकारणे.

4- सायंकाळी कार्यालय/ विभाग बंद करते वेळी सर्व विभागाचे कुलूपे व्यवस्थितरित्या बंद केली किंवा नाही ते तपासणी.

5- संस्थेतील पाण्याच्या टाकीचे वॉटर पंप वेळेनुसार चालु बंद करणे. तसेच वृक्षारोपण अंतर्गत लागलेल्या वृक्षांना जोपासणे .

6- संस्थेत चोरीचा प्रकार झाल्यास सुरक्षा रक्षक यांनी त्याची तकार संबंधीत पोलीस स्टेशनला करणे.

7- गुरे,गाई म्हशी ,जनावरे इत्यादी संस्थेच्या आवारात बांधण्यास व येण्यास प्रतिबंध करणे व त्या अनुषंगाने कार्यवाही करणे.

8- शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळच्या आवारातील बाहेरील व्यक्तीकडुन वृक्षतोड करण्यास प्रतिबंध घालणे व नियमाचे उल्लंघन केल्यास त्या अनुशंगाने कार्यवाही करणे.

9- शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळच्या परिसरातील अतिक्रमण रोखण्यास आवश्यक ती कार्यवाही करणे.

10- सुरक्षा रक्षकांना कार्यालयीन वेळेनंतर व सुट्टीच्या दिवशी दूरध्वनी,टपाल,संदेश आल्यास तो मुख्य नियोक्त्याकडे लगेच पोहचवुन द्यावा लागेल.

11- रात्रपाळी मध्ये सुरक्षा विषयक देखरेख करणे.

12- अधिकारी/कर्मचारी यांना वेळोवेळी सांगितलेली सुरक्षा विषयक कामे करणे.

13- कोविड प्रादुर्भाव टाळण्याचे दृष्टीने सांगितलेली कामे करणे.

14- शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळच्या आवारातील इमारतीतील दिवे लावणे -बंद करणे मेन गेट उघडणे -बंद करणे तसेच कार्यालयातील कार्यालयीन वेळेनंतर बंद होणारी संस्थेच्या परिसरातील विविध विभाग व इमारतीच्या किल्ल्यांची /चावी ची आवक जावक वहीत नोंद घेणे व संबंधित अधिकाऱ्याने वेळोवेळी दिलेले आदेश पाळणे व वेळप्रसंगी अधिकाऱ्यांना संरक्षण देणे ह्या बाबींचा हि समावेश कामाचे स्वरूपात राहील .

15. आणि इतर काही अनुषांगिक कामे, प्रकृतीक आपदा किंवा इतर आपदा पारिस्थितीत, आवश्यक कामे करणे.

16.संस्था प्रमुखाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे काटेकोर पालन करणे.

Scanned with OKEN Scanner

## 5. कंत्राटी द्वारा पालन करावयाच्या अटी व शर्ती

1. सुरक्षा रक्षकांचा गणवेश एक काठी, एक शिट्टी , एक टॉर्च, एक बूट . कंत्राटी मार्फत पुरवण्यात याव्यात तसेच सदर रक्षकास पावसाळ्यात वापरण्यास छत्री अथवा रेनकोर्ट व हिवाळी गणवेश देणे हे कंत्राटी द्वारा बंधक कारक राहील.

2. सुरक्षा रक्षकांच्या सेवा विषयक बाबी कंत्राटी द्वारा बंधक कारक राहतील.

3.सुरक्षा रक्षकांचा कामाच्या वेळा /पाळ्या मुख्य नियुक्त्या किंवा त्यांनी विहित केलेले अधिकारी ठरवतील व त्याप्रमाणे असतील

4. शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ या कार्यालयास पुरविण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांचे नाव पूर्ण पत्ता इत्यादी माहिती कंत्राटी द्वारा या कार्यालयास लेखी स्वरूपात वेळो वेळी कळवावीत. तसेच पोलीस वेरिफिकेशन या कार्यालयामार्फत करण्यात येईल तद्नंतरच सुरक्षा रक्षक सेवा देण्यास पात्र राहील.

5. सुरक्षा रक्षकांची या कार्यालयामार्फत राहण्या ची व्यवस्था केली जाणार नाही.

6. सुरक्षा रक्षकांना पाळी निहाय चार्ज दिल्याची व घेतल्याची सविस्तर नोंद असणारे रजिस्टर अद्यावत ठेवावे लागेल .

7. कोणत्या हि सुरक्षा रक्षकास त्यांच्या पुढील पाळीतील सुरक्षा रक्षक कामावर येई पर्यंत कार्य मुक्त होता येणार नाही एतसेच सेवा काळात काही आवश्यक काम असल्यास सुरक्षा रक्षकास पर्यायी व्यवस्था केल्या शिवाय आपली जागा सोडता येणार नाही

8. सुरक्षा रक्षकांनी शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ परीसरात राहणाऱ्या अधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांना संरक्षण देणे हे त्यांचे कर्तव्य राहील.

9. सुरक्षा रक्षकांच्या गैरहजरीत पर्यायी व्यवस्था करणे कंत्राटीदारास बंधनकारक राहील.

10. सुरक्षा रक्षकांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या सुरक्षा रक्षका मधून एका सुरक्षा रक्षकाची पर्यवेक्षक म्हणून नेमणूक कंत्राटी द्वारा कडून करण्यात यावी. इतर सुरक्षा रक्षकांना जे मानधन देय राहील तेच मानधन सदर पर्यवेक्षक यास देय राहील.

11. सुरक्षा रक्षकांच्या कर्तव्यावर मुख्य नियोक्त्याचे नियंत्रण राहील. त्याचबरोबर कंत्राटीलाही नियंत्रण ठेवावे लागेल. सुरक्षा रक्षकाने कर्तव्य कालावधी मध्ये कोणतेही गैर कृत्य अथवा कामचुकार पणा केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटी वर राहील.

12. सुरक्षा रक्षकाला कर्तव्य वेळेत धूम्रपान किंवा मादक पदार्थांचे सेवन करता येणार नाही. तसेच संस्थेच्या आवारात कोणताही व्यवसाय करता येणार नाही

13. सुरक्षा रक्षकाला कर्तव्य कालावधीत झोपता येणार नाही अथवा कर्तव्याच्या ठिकाणा पासून इतरत्र जाता येणार नाही. जर कर्तव्य कालावधी मध्ये काही गैर कृत्य अथवा चोरी झाल्यास त्याबाबत मुख्य नियुक्ता व कंत्राटी यांच्या तर्फे एकत्रीत रित्या पाहणी /चौकशी करून झालेल्या चोरीला कंत्राटी सुरक्षा रक्षक जबाबदार असल्याने आपणाकडून चोरीच्या मालाची रक्कम वसूल करण्यात येईल.

14. सुरक्षा रक्षकांनी ठरून दिलेल्या परीसरात एकाच ठिकाणी राहणे / बसणे / मद्य किंवा नशायुक्त पदार्थाचे सेवन करणे इत्यादी बाबी आढळयास तसे कंत्राटीस कळविण्यात येईल व कंत्राटी तर्फे सुरक्षा रक्षकावर कार्यवाही होणे बंधन कारक राहील.

15. सुरक्षा रक्षकांच्या कामात त्रुटी निदर्शनास आणून दिल्यावर त्यावर कंत्राटी द्वारास तात्काळ कार्यवाही करावी लागेल.

16.सर्व नेमणूक केलेल्या सुरक्षा रक्षकांची जीवन सुरक्षा विमा काढणे कंत्राटदारास बंधनकारक राहिल. सुरक्षा रक्षकांच्या जिविताची अथवा कोणत्याही हानीस संस्था जबाबदार राहणार नाही.

## 6. सेवा पुरवठादारास बंधनकारक अटी व शर्ती

1. सेवापुरवठादारास राज्य / केंद्र शासनाच्या कामगार कायद्याचे पालन करणे बंधनकारक असेल. कायद्याचे पालन करण्यास कुचराई होत असल्याचे लक्षात आल्यास सेवापुरवठाचेद्वारा कंत्राट तात्काळ रद्द करण्यात येईल व कायदा उल्लंघनासंदर्भातील कायदेशीर कार्यवाहीस सेवापुरवठादार जबाबदार राहील.

2. निवड झालेल्या सेवापुरवठादार संस्थेद्वारे काम करणाऱ्या मनुष्यबळास ओळखपत्र असणे आवश्यक आहे. त्यांनी युनिफॉर्म किंवा ड्रेसकोड मध्ये संस्थेत उपस्थित असणे आवष्यक आहे, सदर ओळखपत्र व ड्रेसकोड सेवा पुरवठादाराने त्यांच्या नेमुन दिलेल्या कामगारांना द्यावयाचे आहे.

3. सेवा पुरवठादाराने सेवा पुरविण्यासाठी नियुक्त मनुष्यबळाने कोणत्याही प्रकारचे धूम्रपान किंवा मद्यपान, संस्थेतील कोणत्याही वस्तुंची चोरी/हानी व गैरवर्तन करणार नाहीत याबाबत त्यांचे हमीपत्र सादर करावे लागेल या अनुषंगाने उद्भवणाऱ्या सर्व घटनांस/परिणामास सेवा पुरवठादार संपूर्णतः जबाबदार राहील. त्यास संस्था कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

4. सेवा पुरवठादाराने पुरवलेल्या मनुष्यबळाच्या कायदेशीर रकमा (उदा. वेतन, पी.एफ., विमा इ.) कामगारास नियमाप्रमाणे अदा करण्याची व त्यांच्या खाती जमा करण्याची जबाबदारी सेवा पुरवठादाराची राहील. याबाबत कामगारांना देय रक्कमांची कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही व तत्सम कागदपत्रे वेळोवेळी संस्थेत सादर करावे लागतील.

5. सेवापुरवठादाराने नियुक्त केलेल्या कामगारांनी कामाचे वेळी शासकीय मालमत्तेची काळजी घेणे आवश्यक असुन शासकीय नुकसान झाल्यास त्याची भरपाई सेवा पुरवठादाराकडून करण्यात येईल.

6. सेवा पुरवठादाराने नियुक्त केलेल्या कामगारांनी काम करताना कार्यालय, कार्यालय परिसरात सुरक्षीततेचे आवश्यक नियमांचे पालन करावे. तथापि काम करतांना काही अपघात इ. झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.

7. सेवा पुरवठादाराला कामाचे आदेश मिळाल्यास त्या तारखेपासून सात दिवसाचे आंत आपले काम सुरू करावे लागेल.

Scanned with OKEN Scanner

8. सेवापुरवठादारा मार्फत नियुक्त कामगारांचे वय कामगार अधिनियमानुसार असावे तसेच नियुक्त कामगार शारिरीकदृष्टया सुदृढ असावा व तसे प्रमाणपत्र संस्थेला सादर करावे लागेल.

9. सेवा ठेका रक्कमेशीवाय कोणत्याही स्वरूपाची अन्य रक्कम देय राहणार नाही. तसेच भविष्यात काही आर्थिकबाबी निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. या कार्यालयाकडून कोणत्याही कामगार वैयक्तिक स्वरूपाचे वेतन व अन्य सवलती संदर्भात मागणी करता येणार नाही.

10. सेवापुरवठादाने सेवा देण्यासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तीस/सुरक्षा रक्षकास या कार्यालयामार्फत नियमित करण्याकरीता व भविष्यात भरावयाच्या पदांवर कोणताही दावा/हक्क सांगता येणार नाही.

11. सेवेदरम्यान नियुक्त सुरक्षा रक्षकाने सतत येरझरा मारणे आवष्यक राहील.खुर्चीवर बसून आढळल्यास त्या दिवसाचे त्यांचे वेतन व तेवढाच दंड कपात करण्यात येईल. संस्थेच्या आवारात कुत्री, गाई, म्हषी यांची सुरक्षा रक्षकांनी काळजी घ्यावी. संस्थेतील कोणत्याही ठिकाणी कुत्र्यांनी घाण केल्यास संबंधित सुरक्षा रक्षकाच्या कर्तव्यात कसूर समजण्यात येईल. शासकीय मालमत्तेची काळजी घेणे आवष्यक असल्यामुळे नियुक्तीच्या पूर्ण परिसरातील सुरक्षा भिंतीच्या कमी कमी दोन फेऱ्या मारणे आवश्यक राहील. शासकीय नुकसान झाल्यास त्यांची भरपाई सेवापुरवठाधारकाकडून करण्यात येईल.

12. कंत्राटी चे काम सुरू झाल्यानंतर कामगारांचा विमा काढणे बंधनकारक राहील.

13. करार संपण्यापूर्वी काम बंद केल्यास सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्यात येईल.

14. आपली सेवा असमाधानकारक तसेच मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने नआढळल्यास आपणावर नियमाप्रमाणे दंड आकारण्यात येईल . कंत्राट कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे अधिकार प्राचार्य / संस्था प्रमुख , शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ यांनी राखून ठेवले आहेत. व या बाबत कंत्राट रद्द झाल्याच्या परिस्थितीतकंत्राटदारणे भरलेलीसुरक्षा ठेव पूर्व सूचना न देता जप्त करण्यात येईल .

15. वरील निविदा रद्द करणे किंवा निविदेमधील अटी व शर्ती यामध्ये बदल करण्याचे किंवा रद्द करण्याचे पूर्ण अधिकार प्राचार्यांना / संस्था प्रमुखांना राहतील.

16. देयक पारीत करणे हे शासनाकडून उपलब्ध अनुदानावर अवलंबून राहील.

17. प्रत्येक महिन्याचे देयक वेगवेगळे सादर करावे लागेल व देयकाची रक्कम कोषागारातून देयक पारित झाल्यावर मिळेल.

18. मासिक देयकामध्ये सेवाकर, आयकर, विमा व इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करणे सेवा पुरवठादाराला आवश्यक राहील व त्याची संपूर्ण जबाबदारी सेवा पुरवठादाराची राहील. देयकामध्ये कुठल्याही प्रकारच्या कराच्या रकमेचा वेगवेगळा समावेश करू नये.

19. सुरक्षा रक्षकांच्या सेवा बंद करावयाच्या असल्यास एक महिना अगोदर नोटीस देणे किंवा एका महिन्याच्या वेतना इतकी रक्कम अमानत ठेवणे मुख्य नियोक्ता व कंत्राटदारास बंधनकारक राहील.

20. सुरक्षा रक्षकांच्या दरमहा वेतनाची जबाबदारी नियोक्ता म्हणजेच कंत्राटदार यांची राहील. शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यावर देयकाची रक्कम नियोक्ता म्हणजेच कंत्राटदारास, प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ यांच्या कडून अदा करण्यात येईल.

21. शासनाव्दारे प्राप्त अनुदानास काही अपरिहार्य कारणामुळे विलंब झाल्यास,अशा परिस्थितीत देय रक्कमेवर कोणत्याही प्रकारच्या व्याजाची मागणी करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

23.सदरचे काम हे कंत्राट पध्दतीचे असल्याने प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ व्दारा कोणतेही कायमस्वरुपी कर्मचारी यांना मिळणारे लाभ आपण नेमलेल्या कर्मचा-यास मिळनार नाही. ते निविदाधारक / कंत्राटदार यांची स्वता: करण्याची जवाबदारी राहिल.

24.प्राप्त निविदांपैकी कोणतेही एक निविदा स्विकारणे अथवा कारणा शिवाय सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवण्यात आला आहे.

25.या बाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास अंतिम निर्णय प्राचार्य प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ यांचा राहिल व तो संबंधित निविदाधारक / कंत्राटदारास मान्य राहिल.

27.शासकीय नियमानुसार लागू असल्यास दि.१-जुलै-२०१७ नंतर लागू झालेल्या जी.एस.टी. भरण्याची सर्वस्वी जवाबदारी ही निविदाधारक / कंत्राटदाराची राहिल यास प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ जवाबदार राहणार नाही.

## 7.निविदाकाराच्या पात्रतेचे निकष

1. निविदाधारककाकडे महाराष्ट्र राज्य पोलीस अनुज्ञप्ती (PASARA) असणे आवष्यक आहे.
2. निविदाकार महाराष्ट्र शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगार विभाग किंवा राज्य / केंद्र शासनाच्या सेवा पुरवठादाराच्या नोंदणीसाठी प्राधिकृत संस्थांकडे नोंदणीकृत असावे. सदर नोंदणी प्रमाणपत्र निविदा भरण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर कमीत कमी एक महिन्यापर्यंत वैध असावा.
3. निविदाकार यांना यापूर्वी राज्य शासन / केंद्र शासन अथवा त्यांची अंगीकृत मंडळे यांना सेवा पुरविण्याबाबत कमीतकमी एक वर्ष इतका अनुभव असणे आवश्यक आहे.
4. नोंदणीकृत आस्थापनेला अनुसरून आवश्यक वैयक्तीक मालकाचे वा संस्थेचे पॅन/टॅन कार्ड असावे.

Scanned with OKEN Scanner

5. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र व सेवापुरवठाधारकाकडे असणे आवष्यक आहे. तसेच व कमीत कमी सहा महिने आधीचे जीएसटी भरणा केल्याचे चालान असणे आवश्यक आहे.
6. वैध इपीएफ नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहील.
7. मागील ०३ वर्षाचे इन्कम टॅक्स रिटर्न फाईल केल्याचा पुरावा असणे आवश्यक आहे.
8. प्रत्येक निविदाकारास निविदा शुल्क रूपये 5000/- ची ना परतावा निविदा शुल्क ऑनलाईन पद्धतीने इ-निविदा संकेतस्थळावर भरण्यात यावी.
9. रु.50,000/- ची परतावा बयाना रक्कम ऑनलाईन पद्धतीने भरण्यात यावी.
10. MSME प्रमाणपत्र असल्यास निविदा शुल्क/ बयाना रक्कम वर सुट देण्यात येईल.
11. शासनाने / संस्थेने Black List नसल्याचे हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

## 8. निविदा सादर करावयाच्या पद्धती

1. प्रत्येक निविदाकाराला एकच निविदा भरता येईल.
2. निविदा भरण्यापूर्वी निविदाकाराने स्वतः प्रत्यक्ष कार्यालयात भेट देऊन सर्व इमारतींची व परिसराची पाहणी करून नंतरच निविदा दाखल करावी.

3. संस्थेत निविदेच्या अंतिम दिनांकाच्या किमान एक आठवड्याआधी Pre - Bid - meet ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात येईल. त्यात निविदा धारकाने किंवा अधिकृत प्रतिनिधीने उपस्तित राहून शंका निरसन करावे. या ऑनलाईन मिटिंग करीत लिंक संस्थेच्या वेब साईट वर दोन तास अगोदर उपलब्ध असेल.

4. अ) तांत्रिक निविदा ऑनलाईन पद्धतीने सादर करतांना (अपलोड करतांना) : खालील कागदपत्रांचा समावेश असेल.

1) कंत्राटदारच्या नोंदिनिकृत संस्थेच्या लेटरहेड वर सोबत दिलेले विवरणपत्र (प्रपत्र -अ मध्ये ).
2) संस्था संबंधीत सेवा पुरविण्यासाठी अधिकृत असल्याचे राज्य/ केंद्र शासनाच्या आवश्यक विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र.
3) संस्थेच्या संचालकांचे अथवा स्वतःचे नाव कार्यालयीन पत्ता व संपर्क क्रमांक यांचे विवरणपत्र.
4) नोंदणीकृत आस्थापनेला अनुसरून आवश्यक वैयक्तिक मालकाचे वा संस्थेचे पॅन/टॅन कार्ड असावे.
5) नोंदणी प्रमाणपत्र व कमीत कमी सहा महिने आधीचे भरणा केल्याचे चालान
6) ई. पी. एफ. रजिस्ट्रेशन क्रमांक व सर्टिफिकेट.
7) मागील वर्षाचे आयकर परतावा विवरणपत्र (इन्कम टॅक्स रिटर्न) भरल्याचा पुरावा.
8) राज्य शासन/ केंद्र शासन अथवा यांची अंगीकृत मंडळे यांना सेवा पुरवण्याबाबत अनुभव प्रमाणपत्र.
9) निविदा शुल्क रु.5000 /- ऑनलाईन पद्धतीने भरल्याची पावती.ती.
10) महाराष्ट्रात सेवा पुरविणेचे अनुज्ञप्ती प्रमाणपत्र असणे आवष्यक आहे.
12) बयाना रक्कम रु.50,000/- ऑनलाईन पद्धतीने भरल्याची पावती.

## प्रपत्र -ब ( वाणिज्यिक दरपत्रक )

1) १) वाणिज्यिक दरपत्रक सोबत जोडलेल्या प्रपत्र - ब मध्ये वाणिज्यिक निविदा प्रपत्र संस्थेच्या लेटरहेडवर भरून सही व शिक्का असलेला कागद BOQ Excel Format PDF upload करण्यात यावा.

## निविदा उघडण्याच्या कार्यपध्दती

1. दिलेल्या तारखेप्रमाणे ऑनलाईन निविदा उघडण्यात येतील व समितीद्वारे तांत्रिक छाननी करण्यात येईल
2. निविदाकाराने Scan करून Upload केलेले सर्व प्रमाणपत्र व त्यांची वैधता तपासण्यात येईल.
3. पात्र निविदा धारकांची यादी संस्थेच्या Web site वर प्रसिद्ध करण्यात येईल.
4. तांत्रिक बाबींच्या छाननी मधून फक्त पात्र असलेल्या निविदा धारकांच्या वाणिज्यिक निविदा उघडण्यात येईल.
5. वाणिज्यिक निविदेत संपुर्ण कामाचा सर्व करासहीत एकत्रित दर नमूद नसल्यास निविदा फेटाळण्यात येईल.
6. दोन किंवा अधिक निविदाकारांच्या दरांमध्ये समानता असल्यास या क्षेत्रात सेवा देण्याचा एकूण अनुभव असलेल्या सेवा पुरवठा धारकांना प्राधान्य देण्यात येईल.

## कार्यादेश देण्याची कार्यपध्दती

1. सदर कामाचे आदेश मा. सहसंचालक, तंत्रषिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती यांचे कडून प्रशासकीय मंजूरी मिळाल्यानंतर देण्यात येतील.तसेच सुरक्षा सेवेची मासिक देयके हि शासकीय अनुदानांमधून अदा करण्यात येत असल्यामुळे सदर देयकांची अदायगी हि शासकीय अनुदानाच्या उपलब्धतेवर अवलंबून असेल ह्याची नोंद घ्यावी.

Scanned with OKEN Scanner

2. सेवापुरवठा धारकाने रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर दस्तऐवज वरीलप्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्याचा करारनामा नोटरी करुन सादर करणे आवश्यक आहे.

3. अनुक्रमांक 2 ची पूर्तता केल्यानंतर कार्यादेश देण्यात येईल व त्यानंतर 7 दिवसाच्या आत 3 महिन्याच्या कालावधीच्या एकूण न्यूनतम रकमेच्या 10 टक्के सुरक्षा ठेव बँक गॅरंटी स्वरुपात जमा करावी लागेल. करार संपण्यापूर्वी काम बंद केल्यास त्यांची सुरक्षा ठेव जप्त करुन शासन जमा करण्यात येईल.

**(निविदा धारकांनी/ कंत्राटदारच्या नोंदिनिकृत संस्थेच्या लेटरहेडवर भरून सादर करणे)**

**प्रपत्र :-अ (तांत्रिक निविदा विवरण नमुना)**

1. कंत्राटदाराच्या संस्थेचे नाव :
2. संपूर्ण कार्यालयीन पत्ता :
3. संस्थेचा नोंदणी क्रमांक:
4. ज्या प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली आहे त्याचा संपूर्ण पत्ता:
5. निविदाधारक /संचालकांचे नाव: संपर्काकरिता संपूर्ण पत्ता: ई-मेल:
6. अनुभवाचा तपशील (आवश्यक प्रमाणपत्रे जोडावीत):
7. निविदाधारक /संचालकांचे ओळखपत्राचा तपशील:
8. खालील तपशील भरून आवश्यक प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रति जोडाव्यात .

| अ.क्र. | विवरण/ प्रमाणपत्र | तपशील |
|---|---|---|
| 1 | संस्था संबंधित सेवा पुरविण्यासाठी अधिकृत असल्याचे राज्य / केंद्र शासनाच्या आवश्यक विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक | |
| 2 | संस्थेचा PAN/TAN कार्ड नंबर | |
| 3 | सर्व्हिस टॅक्स व GST रजिस्ट्रेशन क्रमांक | |
| 4 | मागील वर्षाचा इन्कमटॅक्स रिटर्न भारल्याचा पुरावा | |
| 5 | निविदा शुल्क रु.5000/-भरल्याचा पुरावा (रोखपावती क्रमांक व दिनांक) | |
| 6 | वैध ई.पी.एफ. रजीस्ट्रेशन नंबर | |
| 7 | राज्य/केंद्र शासन अथवा यांची अंगीकृत मंडळे यांना सेवा पुरवण्याबाबतचा अनुभव प्रमाणपत्र | |

9.इतर माहिती. --------------------------------------------------------------

मी खाली सही करणार असे शपथपूर्वक प्रमाणित कार्लोकी,वर नमूद करण्यात आलेली माहिती खरी आहे.खोटी आढळल्यास होणाऱ्या परिणामाची जबाबदारी माझी राहील.तसेच सदर कंत्राटासाठी आपण निविदा प्रपत्रात नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत .

स्थळ :
दिनांक:

कंत्राटदारची सही व शिक्का

नाव:

Scanned with OKEN Scanner

## निविदा स्विकारण्याची शेवटची तारिख आणि वेळ

उपरोक्त सिलबंद निविदा जाहिरात दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे स्विकारण्यात व उघडण्यात येईल. याकरीता वेगळा पत्रव्यवहार किंवा दुरध्वनीव्दारे संपर्क केल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कार्य विवरण | कालावधी |
|---|---|---|
| 1 | इ - निविदा प्रकाशित करण्याचा दिनांक | ०५/१२/२०२३ |
| 2 | संकेत स्थळावर इ - निविदा उपलब्ध करणे | ०६/१२/२०२३ |
| 3 | इ - निविदा सादर करण्याचा सुरवातीचा दिनांक | ०६/१२/२०२३ |
| 4 | इ - निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | १६/१२/२०२३ |
| 5 | तांत्रिक निविदा छाननी | १८/१२/२०२३ |
| 6 | सर्व वाणिज्यिक निविदा उघडणे | २६/१२/२०२३ |

स्वाक्षरी /-
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ.

सहपत्र :- विवरणपत्र 'अ' व प्रपत्र 'ब'

### प्रपत्र -ब ( वाणिज्यिक निविदा विवरणपत्र)

1. सेवापुरवठा ज्या ठिकाणी पाहिजे त्या संस्थेचे नांव:- **प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ, महाराष्ट्र.**

| अ.क्र. | कामाचे वर्णन | कंत्राटी तत्वावर पुरविण्यात येणारे मनुष्यबळ |
|---|---|---|
| १ | | प्रतिमाह संपूर्ण मनुष्यबळ पुरविण्याचा एकत्रित दर रुपये (किमान वेतन नुसार मासिक कामगाराला वेतन व त्यावरील एजन्सीचे कमिशन सर्व करासहित नमूद करावे) |

कंत्राटदाराची सही व शिक्का

स्थळ:
दिनांक:

स्वाक्षरी /-
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ

Scanned with OKEN Scanner